६

# अलंग रिसायकलींग शीपयार्ड येथील कामगारांचे शोषणः एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. सदाशिव शंकर शेंडे**
पत्रकार, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
गुलटेकडी, पुणे - ३७

## Abstract (सारांश) :

'अलंग रिसायकलींग शीपयार्ड' हे भारतातील महत्त्वाचे जहाज तोडणी केंद्र असून ते (गल्फ ऑफ खंभातच्या सागरी किनारी) गुजरात राज्यातील भावनगर शहरापासून सुमारे ५० कि.मी. अंतरावर वसलेले आहे. जहाज तोडणी प्रक्रियेसाठी लागणाऱ्या सर्व नैसर्गिक गोष्टी इथे पूरक ठरत असल्याने सागरी किनारी अलंग सोसियो या गावाची निवड करण्यात आली आहे.

१३ फेब्रुवारी १९८३ रोजी अलंग येथे MVKOTA TENJONG हे पाहिले. निकामी जहाज, बंदरात दाखल झाले. अलंग - सोसियो या दोन्ही गावाचा मिळून १५ कि.मी. च्या परिसरात आज सुमारे १७८ प्लॉटस जहाज तोडणीच्या कामात व्यस्त आहेत. या शीपयार्डात जहाज तोडणीचे काम करणारे सर्वच कामगार स्थलांतरित व असंघटित असून ते बिहार, ओरिसा, उत्तरप्रदेश व झारखंड राज्यातून आले आहेत. इथे अंदाजे ३० हजार कामगार काम करत आहेत. गुजराथ मेरीटाईम बोर्ड या निमसरकारी संस्थेमार्फत या केंद्राची देखभाल केली जाते. शीप ब्रेकर्स व्यावसायिकांना जहाज तोडणीसाठी प्लॉट उपलब्ध करून देणे व त्यांना इतर सोईसुविधा पुरविण्याचे काम ही संस्था करते. त्याबदल्यात व्यावसायिकांकडून ती भाडे आकारणी करते. गुजराथ मेरी टाईम बोर्डामार्फतच या स्थलांतरीत कामगारांना तीन दिवसांचे जहाज जोडणीचे प्रशिक्षण व सुरक्षा संदर्भांतले नियम समजावून सांगितले जातात. प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या कामगारांना प्लॉटवर काम करता येते. निकामी जहाजातून मोठ्या प्रमाणावर गृहपयोगी वस्तू, फर्निचर व मोठ्या प्रमाणावर स्टील उपलब्ध होते. इथे प्रवासी, मालवाहतूक कंटेनर, कारफेरी व संरक्षण खात्यातील निकामी जहाजे संपूर्ण जगातून तोडण्यासाठी उपलब्ध होतात. या उद्योगाची वार्षिक उलाढाल ही २५ बिलीयन एवढी आहे. त्यामधील ७ बीलीयन एवढे उत्पन्न हे गुजरात मेरी टाईम बोर्डाला मिळते. अलंग शीपयॉर्डाच्या निर्मितीमुळे

आजूबाजुच्या गावातही आमुलाग्र, बदल झाला आहे. भावनगर शहराचाही चेहरा मोहरा बदलला आहे. मात्र शीपयार्डात काम करणाऱ्या या स्थलांतरीत कामगारांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक मानसिक व शारिरीक शोषण होत आहे. अलग रिसायकलींग शीपयार्ड हे असंघटित कामगारांचे एक उत्तम असे उदाहरण आहे.

**Introduction** प्रस्तावना :

एकेकाळी शेतीप्रधान समजल्या जाणाऱ्या भारत देशाची आजची परिस्थिती बदलेली आहे. शेतीची दुरावस्था, वाढत्या जागतिकीकरणाचा प्रभाव नवनवीन उद्योग धंद्याना मिळालेली चालना. वाढते शहरीकरण त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी त्यामुळे आज मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होताना दिसून येत आहे. स्थलांतरापाठीमागे बेरोजगारी व गरीबी हे जसे घटक आहेत त्याचप्रमाणे भौतिक सुखसोई, कामाच्या ठिकाणी मिळणारी उचल, खर्ची याही गोष्टीमुळै आज मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होताना दिसून येत आहे.

स्थलांतरामध्येही कुशल-अकुशल संघटित असंघटित कामगार पहायला मिळत आहेत. संघटित कामगारांना मिळणाऱ्या सोईसुविधा व त्यांचे भवितव्य सुरक्षित आहे. मात्र असंघटित कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होताना दिसून येत आहे. त्यांना भेडसावणाऱ्या समस्याही अनेक आहेत.

अलंग रिसायकलींग, शीपयार्डात काम करणारे हे कामगार स्थलांतरित व असंघटित आहेत. जहाज तोडणीचे अतिशय कष्टप्रद व जोखमीचे काम ते करत आहेत.

१९८० सालापूर्वी सुरवातीला शीप ब्रेंकीग चा व्यवसाय हा पूर्वेकडील प्रगत देशांमध्येच होता. मात्र  पुढे प्रदुषणामुळे पर्यावरणाला निर्माण होणारा धोका आणि सहज उपलब्ध न होणारा कामगार वर्ग त्यामुळे  शीप ब्रेकींगचा हा व्यवसाय १९८० सालानंतर विकसित देशाकडून विकसनशील देशांकडे हस्तांतरीत करण्यात आला, त्यात भारत, बांगलादेश, चीन, पाकिस्तान व तूर्कीस्तान येथे हा व्यवसाय सुरू झाला. दरवर्षी सुमारे ८०० ते ९०० निकामी जहाजे तोडण्यासाठी उपलब्ध होतात. त्यापैकी ३५० ते ४५० जहाजे ही भारताला मिळतात.



Vol: 3rd , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2015,ISSN : 2319-5525

तक्ता क्र.१

जगतील महत्त्वाची जहाज तोडणी केंद्र

| देश | शीपयार्डचे नाव |
|---|---|
| भारत | अलंग |
| पाकिस्तान | गडानी |
| बांगलादेश | चितगांव |
| चीन | चीन ऑन झॉंग |
| तूर्की | अलीआगा |

तक्ता क्र.२

भारतातील महत्त्वाची जहाज तोडणी केंद्र

| राज्य | गावाचे नाव |
|---|---|
| गुजराथ | अलंग, साचना |
| महाराष्ट्र | दारूखाना (मुंबई) |
| कर्नाटका | तारडी, मैपे बेपोर |
| आंधप्रदेश | विशाखापट्टणम |
| तामिळनाडू | वेलिनोकन, नाडू तुतिकोरिन |

वरील जहाज तोडणी केंद्रामध्येही सर्वात महत्त्वाचे स्थान हे अलंग रिसायकलींग शीपयार्डाला प्राप्त झाले आहे. प्राप्त झालेल्या माहितीनुसार इतर देशापेक्षाही भारतातील जहाज तोडणीचे प्रमाण अधिक आहे. भारत ३८%, चीन २५%, बांगला देश १९% व पाकिस्तान ९% इतके आहे.

भारतात गरजेपोटी स्थलांतरित होणाऱ्या कामगारांचे प्रमाण अधिक आहे. अलंग रिसायकलींग शीपयार्डात कुशल/अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध होत असल्याने इथे स्थलांतराचे प्रमाणे अधिक आहे. भारताच्या एकूण लोकसख्येच्या ९०% लोक हे असंघटित क्षेत्रात काम करत आहेत.



Vol: 3rd , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2015,ISSN : 2319-5525

<u>समस्या सूत्रण :</u> स्थलांतरीत संघटित कामगारांना कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या मूलभूत सोईसुविधा उपलब्ध होत नाहीत. मिळेल तिथे आणि मिळेल ते काम करण्यासाठी त्यांना स्थलांतरित व्हावे लागते. अलंग शीपयार्डात काम करणारे कामगार हे स्थलांतरित व असंघटित आहेत. अत्यंत कमी मोबदल्यात जोखीमपूर्ण व कष्टाचे काम त्यांना करावे लागते. त्यांच्या अडचणी व त्यांच्या समस्यांचे संशोधन करण्याचा प्रयत्न या अभ्यासाच्या माध्यमातून केला आहे.

## <u>Review of Literature :</u>

साहित्याचा आढावा जनरल व समाजशास्त्रीय.

जनरल : भारतात संघटित व असंघटित असे दोन प्रकारचे कामगार पहायला मिळतात. असंघटित कामगारांची संख्या अगणित आहे. संघटित कामगारांच्या हक्काची व हिताची जोपासणी करणारे कायदे व कायमस्वरूपी नोकरीची हमी त्यामुळे संघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता व आर्थिक स्थैर्य प्राप्त होते. असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार हे अशिक्षित गरीब व निम्न वर्गातील असतात. त्यांना कोणत्याही प्रकारचे स्थैर्य नसते. त्यांच्या परिस्थितीचा फायदा भांडवलदार घेतात आणि त्यांचे शोषण करतात.

समाजशास्त्रीय साहित्याचा आढावा :

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून या साहित्याचा अभ्यासाचा आढावा घेतला असता सामाजिक विचारवंत व साम्यवादाचे पुरस्कर्ते कार्ल मार्क्स यांची प्रकर्षाने आठवणे होते. कार्ल मार्क्स यांचा ऐतिहासिक भौतिकवाद व श्रममूल्याचा सिद्धांत या दोन्ही सिद्धांताच्या आधारे भांडवलशाही समाजरचनेत कामगारांचे शोषण कसे होते. समाजातील आहे रे वर्गाकडून नाही रे वर्गाचे शोषण कसे केले जाते. हे दाखवले आहे. नवमार्क्सवादी विचारसरणीच्या सामाजिक विचारवंतानी मार्क्सच्याच विचारासरणीला अनुसरून आपले विचार मांडलेले आहेत. मॅक्सवेबर यांनी आपल्या आर्थिक क्रियेच्या संदर्भात विवेचन करताना सांगितले आहे की आर्थिक कार्यक्रम हे आधुनिक समाजाचे लक्षण आहे. आर्थिक क्रियेच्या सहाय्याने लोकांच्या आवश्यक गरजा पूर्ण झाल्या तर समाजातील प्रश्न आपोआप सुटतात. मानवी हक्काच्या संदर्भातही वेबर सांगतात की मानवी हक्कच आपल्याला खरे जीवन, जगण्याची व जीवनाचा विकास करण्याची संधी देतात. अधिकार आणि सत्तेच्या संदर्भात विवेचन करताना त्यांनी सांगितले आहे की, नुसती सत्ता आणि अधिकार असून उपयोग होत नाही सत्तेचा आणि अधिकाराचा गैरवापर झाला तर त्याचे दुष्परिणाम हे संपूर्ण समाजालाच भोगावे लागतात.



Vol: 3rd, Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2015,ISSN : 2319-5525

जान ब्रेमन या जर्मनीच्या सामाजिक विचारवंताने गुजराथ राज्यातील दक्षिण गुजराथ मधील असंघटित कामगारांच्या संदर्भात आपले विचार मांडले आहेत. त्यांनी उसतोडणी, हिरे कारागिर, रस्तेबांधणी, इमारत, वीटभट्टी, शेतमजूर व मीठ कामगारांच्या संदर्भात आपले विचार मांडले आहेत व असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या या कामगारांना अतिशय हलाखीचे जीवन जगावे लागते. ते कायम कर्जबाजारीच्या विळख्यात अडकलेले असतात. स्मीता पंजीआर व श्रीवास्तव यांनी Locked homes and empty schools या पुस्तकाच्या माध्यमातून स्थलांतरीत कामगार हे अनुसूचित जाती जमातीतील लोक असतात. ते गरीब अशिक्षित असतात. स्थलांतरामुळे या कामगारांच्या मुलांच्या जीवनावर कसा परिणाम होतो. परिस्थितीमुळे त्यांना लहानपणीच शाळेकडे पाठ फिरवून वंचिताचे जीवन जगावे लागते हे दाखवले आहे. डॉ.रॉबिन त्रिभुवन यांनी खाणीतील दगड फोडणाऱ्या स्थलांरित कामगारांचा अभ्यास केला आहे. त्यात त्यांनी दाखवून दिले आहे की या कामगारांनाही कायम स्वरूपाचे काम वा वेतनाची हमी नसते. आर्थिक व सामाजिक सुरक्षितता नसते. डॉ.रॉनिब त्रिभूवन व सदाशिव शेंडे यांनी खराघोडा गावातील (गुजराथ राज्य जिल्हा सुरेंद्रनगर) मीठ कामगारांचा अभ्यास केला. त्यातही या मीठ कामगारांना मीठ उत्पादनासाठी आठ महिने रणात स्थलांतर करावे लागते. मीठ, उत्पादनासाठी आधी उचल घेऊन व्यापारी सांगेल त्या भावालाच मीठ विकावे लागते. त्यामुळे हजारो टन मीठाचे उत्पादन करूनही या लोकांना वेठबिगारीचे जीवन जगावे लागते. गुरूनाथ नाडगोंडे यांनी आपल्या औद्योगिक समाजशास्त्र या पुस्तकातूनही हेच विवेचन केले आहे की, अर्थाजनासाठी मानवाला वारंवार स्थलांतर करावे लागते. असंघटित कामागारांचे आजही मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे. त्यामुळे हे लोक कर्जबाजारी होतात आणि वेठबिगारीच्या विळख्यात फसत जातात. वेठबिगारी ही तर भारतातील असंघटित कामगाराची मोठी समस्या आहे. त्याचबरोबर, सौराष्ट्र युनिर्व्हसिटीतील डॉ.सुमनबेन चौधरी व सरदार पटेल युनिर्व्हसिटीतील डॉ.कौशिक शुक्ल (१९९९ पीएचडी प्रबंध) त्यांनीही या विषया संदर्भात अभ्यास केला आहे. डॉ.सुमनबेन चौधरी यांनी अलंग शीपयार्डमुळे आजूबाजुच्या परिसरावर झालेला प्रभाव आपल्या विषयातून मांडला आहे. त्यात त्यांनी स्थलांतरित कामगारांच्या संदर्भातील विवेचन केले आहे. (मे २००१) प्रा.विद्युत जोशी, प्रा.एच.सी.दुबे यांनी सादर केलेला अलंगच्या विकासासंदर्भात सादर केलेला अंतिम अहवाल. त्यातूनही कामगारांच्या शोषणावर प्रकाश पडला आहे.

...



Vol: 3rd, Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2015,ISSN : 2319-5525